अधिसूचना

क्रमांक : १४३/२०२३ दिनांक : ०७/०९/२०२३

विषय :- कॅरी-ऑन देण्याबाबत.

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, विद्यापीठ प्राधिकारीणीने घेतलेल्या निर्णयानुसार पदवी परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र २०२३-२०२४ मध्ये विशेष संधी म्हणून प्रवेश देण्यास (यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचना क्र १२५/२०२३ व १४०/२०२३ व्यतिरिक्त) खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे :-

१) प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणा-या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्राकरिता किंवा जेथे लागू असेल तेथे द्वितीय वर्षांमध्ये अनुत्तीर्ण असणा-या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षांच्या सातव्या सत्राकरिता किंवा जेथे लागू असेल तेथे तृतीय वर्षांमध्ये अनुत्तीर्ण असणा-या विद्यार्थ्यांना पाचव्या वर्षाच्या नवव्या सत्राकरिता संबंधित अभ्यासक्रमासाठी वेळोवेळी निर्गमित अध्यादेश व निदेशामधील पुढील वर्षाच्या प्रवेशासाठी पात्र होणा-या अटी व शर्तीच्या अधीन राहून तात्पुरता (प्रोव्हीजनल) प्रवेश देण्यात यावा. त्याबाबतचे हमीपत्र प्रवेश घेणा-या प्रत्येक विद्यार्थ्याकडून महाविद्यालयाने घेणे अनिवार्य असेल.

२) तृतीय वर्षांच्या पाचव्या सत्रामध्ये अथवा चतुर्थ वर्षांच्या सातव्या सत्रामध्ये अथवा पाचव्या वर्षांच्या नवव्या सत्रामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबी जसे अध्ययन, प्रात्याक्षिके, टर्मवर्क, फिल्ड व्हिजिट व इतर बाबी महाविद्यालयाने इतर नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे पूर्ण करून घ्याव्यात. त्याबाबतच्या परीक्षा व इतर बाबी या हिवाळी २०२३ या परीक्षांमध्ये अनुशेषाने विषय पूर्णतः उत्तीर्ण होऊन जे विद्यार्थी प्रचलित तृतीय वर्षांमध्ये/चतुर्थ वर्षांमध्ये/पाचव्या वर्षांमध्ये प्रवेश घेण्यास पात्र ठरतील, अशाच विद्यार्थ्यांचा प्रवेश पुढील सत्रासाठी सुरू ठेवण्यात येईल. मात्र सर्व विद्यार्थ्यांचे सत्र पाचवे/सातवे/नवव्यामधील अध्ययन, अध्यापन, प्रात्याक्षिके, टर्मवर्क, फिल्ड व्हिजिट व इतर बाबींचे परीक्षांमधील श्रेयांक/गुण ग्राह्य धरावे.

३) सत्र पाचव्या/सातव्या/नवव्या मधील पात्र विद्यार्थ्यांनीच संबंधित अभ्यासक्रमासाठी वेळोवेळी निर्गमित अध्यादेश व निदेशामधील तरतुदींनुसार परीक्षा आवेदनपत्रे विद्यापीठास सादर करावीत.

४) सत्र पाचवे व सहावे/सातवे व आठवे/नववे व दहावे करिताच सत्र समाप्तीच्या परीक्षा संबंधित विद्यार्थ्यांना एकत्रित अर्थात उन्हाळी २०२४ च्या परीक्षांमध्ये देता येतील.

५) जे प्रवेशित विद्यार्थी हिवाळी २०२३ मधील परीक्षेमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षांचे अनुशेष पूर्ण करू शकणार नाहीत व संबंधित अभ्यासक्रमासाठी वेळोवेळी निर्गमित अध्यादेश व निदेशामधील तरतुदींनुसार तृतीय/चतुर्थ/पाचव्या वर्षाच्या अनुक्रमे पाचव्या/सातव्या/नवव्या सत्राकरिता अपात्र ठरलीत अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश हा आपोआप रद्द होईल. तसेच अशा विद्यार्थ्यांना सहाव्या/आठव्या/दहाव्या सत्राची परीक्षा देता येणार नाही.

पुढे असाही निर्णय घेण्यात येतो की, ज्या अभ्यासक्रमांना शिखर संस्थांचे या संदर्भात विशिष्ट असे नियम असतील अशा अभ्यासक्रमांच्या बाबतीत, त्या त्या शिखर संस्थांचे या संदर्भातील नियम लागू राहतील.

सदर निर्णय फक्त **शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४** या एकाच शैक्षणिक वर्षासाठी विशेष बाब म्हणून विद्यार्थी हितास्तव लागू राहील.

स्वा/-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

******